# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. 42/ 2023

**पीएच.डी. अभ्यासक्रम 2022 प्रवेश प्रक्रिया द्वितीय फेरी**

सदर परिपत्रकाद्वारे मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, मा.प्राचार्य सर्व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन संस्था यांना कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रम 2022 साठी पहिली प्रवेश फेरी पूर्ण झाली आहे. पहिल्या फेरीतील पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी भरलेल्या जागा विचारात घेऊन उर्वरित रिक्त जागा भरण्यासाठी तसेच नव्याने मिळालेल्या मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शकांना व पदोन्नतीने प्रवेशासाठी वाढलेल्या अधिकच्या जागा भरण्यासाठी तातडीने दुसऱ्या प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**मार्गदर्शकांसाठी रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी प्रक्रिया:**

१. मार्गदर्शकांनी त्यांच्या BCUD Lokgin च्या Teacher Login व्दारे Login करावे.
   - Login झाल्यानंतर Vacant Position for Ph.D. Admission 2022 या मधून Link Open करावी.
   - Declare Vacancies या टेबल मधील Edit Tab वर Clik करावे.
   - मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना खालील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.
     - Approval संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.
     - PG Recognition/Research Guide Details संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.

२. विद्यापीठ परिपत्रकानुसार नव्याने मान्यता प्राप्त मार्गदर्शक, त्यांच्या पदोन्नतीने पीएच.डी. साठी विहीत संशोधक विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व वेळोवेळी त्यांच्याकडील संशोधक विद्यार्थ्यांचे पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यामुळे झालेल्या रिक्त जागा इत्यादी सर्व पात्र मार्गदर्शकांनी आपल्या लॉगीनमधून ऑनलाईन पद्धतीने दि. 27/03/2023 पर्यंत अद्ययावत कराव्यात.

३. मार्गदर्शकाकडे रिक्त जागा नसल्यास BOD Login मधून शून्य जागा अद्ययावत करणे आवश्यक आहे.

४. काही मार्गदर्शकाच्या लॉगीनमध्ये पीएच.डी. पूर्ण झालेले/संशोधन केंद्र बदललेले / प्रवेश रद्द झालेले विद्यार्थी दिसत असतील तर त्यांनी त्यांच्या लॉगीन मधून विद्यापीठाने निर्गमित केलेले Declaration/ पत्र अपलोड करावे जेणेकरून त्यांच्या लॉगीनमधून सदर विद्यार्थ्यांची नोंद रद्द करता येईल.

**विद्यापीठ विभाग/संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रासाठी तसेच संशोधन मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक सूचना:**

सर्व विद्यापीठ विभाग/संलग्नित संशोधन केंद्र यांनी खालीलप्रमाणे पीएच.डी. अभ्यासक्रम २०२२ च्या दुसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया पूर्ण करावी.

१. सर्वप्रथम संशोधन केंद्रानी त्यांच्या BOD Login मधून 2022-23 चे संलग्निकरणाचे पत्र अपलोड करावे. त्यास विद्यापीठाकडून मान्यता मिळाल्यानंतर दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी जागा अद्ययावत करण्याची पुढील प्रक्रिया पूर्ण करता येईल.

२. संशोधक मार्गदर्शकांनी अद्ययावत केलेल्या रिक्त जागांची माहिती Confirm करून संशोधन केंद्रांनी त्यांच्याकडील सर्व विषयांच्या पीएच.डी. प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती BOD Login मधून दि.31/03/2023 पर्यंत भरावी.

३. सर्व संशोधन केंद्रांनी रिक्त जागा दर्शवितांना संबंधित मार्गदर्शकाचे वैध मार्गदर्शक मान्यतापत्र (Updated Guideship Letter) असल्याची खातरजमा करावी.

४. मार्गदर्शक संशोधन केंद्राबाहेरील असल्यास याबाबत विद्यापीठाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

५. सर्व संशोधन केंद्रांनी वरील सर्व प्रक्रिया दि. 31/03/2023 पर्यंत पूर्ण करावी. यानंतर महाविद्यालय/विभागाच्या BOD Login मध्ये त्यांच्या संशोधन केंद्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करून देण्यात येईल.

६. सर्व संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी दि. 10/05/2023 पर्यंत दुसऱ्या फेरीतील मुलाखत प्रक्रिया पूर्ण करून मुलाखत अहवाल स्वयंस्पष्ट शेऱ्यासह (Selected/Not Selected) व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह Online पद्धतीने भरून त्यांच्या छापील प्रती शैक्षणिक प्रवेश विभागात विहीत मुदतीमध्ये जमा कराव्यात.

७. प्रवेश यादीस अंतिम स्वरूप देताना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रवर्गाची अदलाबदली करू नये. आरक्षणाच्या नियमानुसार त्या-त्या प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षित जागेवर त्याच प्रवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करावी.

८. अराखीव (Unreserved) प्रवर्गातील उमेदवाराकडे शासन निर्गमित आर्थिक दुर्बल घटकात मोडत असल्याचे (EWS) 2022-23 या आर्थिक वर्षासाठीचे निर्गमित झालेले प्रमाणपत्र उपलब्ध असेल तर EWS या प्रवर्गामध्ये त्या विद्यार्थ्याची निवड करता येईल.

९. विद्यापीठाचे संशोधन केंद्र मान्यता पत्र शैक्षणिक वर्ष 2022-23 चे असल्याशिवाय प्रवेश प्रक्रिया करू नये.

१०. Ph.D. Admission Round I प्रक्रिया पूर्ण केलेल्या महाविद्यालयानांच प्रवेश प्रक्रिया द्वितीय फेरी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

११. सर्व विद्यापीठ विभाग/ सर्व संलग्नित संशोधन केंद्रांनी प्रवर्गनिहाय एकूण आरक्षणाच्या टक्केवारीबाबत शासन निर्णयातील तरतुदी व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील तरतुदीनुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग/मा. प्राचार्य, संलग्नित संशोधन केंद्र यांची राहील. वरील सर्व प्रक्रियेमध्ये शासनाने/विद्यापीठाने निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक यांचे तंतोतंत पालन करावे तसेच वरील प्रक्रियेबाबत विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क:
Email: phdtracking_support@pun.unipune.ac.in
Phone: 020-71533633

**महत्वाच्या तारखा:**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1. | संशोधक मार्गदर्शकांनी जागा अद्ययावत करणे | दिनांक: 21/03/2023 ते 27/03/2023 |
| 2. | मार्गदर्शकांनी अद्ययावत केलेल्या जागा संशोधन केंद्रांनी आरक्षणनिहाय निश्चित करणे. | दिनांक: 28/03/2023 ते 31/03/2023 |
| 3. | विद्यार्थ्यांनी आरक्षणनिहाय जागा पाहून संशोधन केंद्र निवडणे/बदलणे. | दिनांक: 31/03/2023 ते 10/04/2023 |
| 4. | विद्यापीठाकडून संशोधन केंद्राना विद्यार्थ्यांनी निवडलेल्यानुसार याद्या पाठविणे. | दिनांक: 11/04/2023 ते 12/04/2023 |
| 5. | संशोधन केंद्रानी मुलाखतींचे आयोजन करून मुलाखत प्रक्रिया पूर्ण करणे. | दिनांक: 13/04/2023 ते 10/05/2023 |

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ: शै.प्रवेश/1394
दिनांक: 20/03/2023

**प्रत:**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

..3..